जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2025
तरुण भारत

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विद्यापीठात दोन ग्रंथांचे प्रकाशन

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दोन महत्त्वाच्या पुस्तकांचे प्रकाशन येत्या शनिवारी ३१ मे रोजी सकाळी १० वाजता व्यवस्थापन परिषद सभागृहात होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासनाच्या वतीने नियोजित ग्रंथमालेअंतर्गत डॉ. मच्छिंद्र गोफणे आणि डॉ. नीलेश शेळके लिखित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: जीवन आणि कार्य' हा ग्रंथ आणि दत्तात्रय भैरवनाथ घुटूगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाची १६ हजार विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी विविध ४४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १७४ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. परीक्षांसाठी १६,८९१ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात २० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, तर शुक्रवारअखेर ३३७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत.

3 1 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या ३३७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाने आजअखेर उन्हाळी सत्रातील एकूण ३३७ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल जाहीर केला आहे. दिवसभरात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध १७४ केंद्रांवर ४४ अभ्यासक्रमांच्या एकूण १६ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाने डिफेन्स स्टडीज, बी. आर्किटेक्चर, बी. व्होक. ग्राफिक्स डिझाईन, एम. एम. संस्कृत, आदी विविध वीस अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले. आजअखेर ३३७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. दिवसभरात बी. ए., एमबीए., डिप्लोमा इन टॅक्सेशन, बिझनेस मॅनेजमेंट, हिंदी ट्रान्सलेश्न विविध ४४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १७४ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. एकूण १६ हजार ८९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे.

दरम्यान, बारावीनंतर विविध नऊ अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची संधी आहे. त्यात बी. ए. स्पोर्टस्, फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस ॲण्ड इन्शुरन्स (बीएफएसआय), बी. एस्सी.- एम. एस्सी. नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, बी. एस्सी. एम. एस्सी एआय ॲण्ड मशीन लर्निंग, बी. एस्सी.-एम. एस्सी. इकॉनॉमिक्स इंटिग्रेटेड, बीबीए-एमबीए., बी. एस्सी. बी. एड., बीसीए या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत उद्या, शनिवारपर्यंत आहे.

**प्रवेश परीक्षांचा पुढील आठवड्यात निकाल**

एम. एस्सी., रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, बायोकेमिस्ट्री, पर्यावरण, अर्थशास्त्र अशा २९ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाने ऑफलाईन ओएमआर शीटवर १३ ते १७ मेदरम्यान प्रवेश परीक्षा घेतली आहे. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे.

त्याचा निकाल ३ ते ५ जूनदरम्यान जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध होऊन कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना अपॉईंटमेट लेटर जाईल. या विद्यार्थ्यांनी त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.